21 APR 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संविधान, धर्मनिरपेक्षतेमधूनच लोकशाही सुरक्षित राहील

डॉ. जयसिंगराव पवार : डॉ. चौसाळकर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त गौरवांकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : संविधान आणि धर्मनिरपेक्षता यांच्या अनुषंगाने विचारांची मांडणी होईल, तेव्हाच लोकशाही सुरक्षित राहील, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद, विचारशलाका त्रैमासिक, लातूर आणि पुणे येथील द युनिक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने येथील शाहू स्मारक भवनातील मिनी सभागृहात प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त विचारशलाका लोकशाही विशेषांक व गौरवांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पवार बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते.

कोल्हापुरात शाहू स्मारक भवनातील मिनि सभागृहात शनिवारी डॉ. अशोक चौसाळकर अमृतमहोत्सवानिमित्त गौरवांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी किशोर बेडकीहाळ, डॉ. अशोक चौसाळकर, गौरी चौसाळकर, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. गोपाळ गुरु, डॉ. नागोराव कुंभार, भारती पाटील उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

डॉ. पवार म्हणाले, सच्चे लोकशाहीवादी डॉ. चौसाळकर यांचे आतापर्यंतच्या विचारवंतांच्या पंक्तीत महत्वाचे स्थान आहे. भारतीय लोकशाही एखाद्या किल्ल्यासारखी मजबूत आहे. परंतु तिचे अनेक बुरुज सध्या ढासळत आहेत. अनेक सुरुंग पेरलेले आहेत. परंतु ते काढून टाकण्याचे सामर्थ्य भारतीय जनतेत आहे. डॉ. चौसाळकर म्हणाले, राजकीय तत्वज्ञान आणि राजकीय दृष्टिकोण यावर माझा पिंड पोसला. नवमार्क्सवाद हाच जगाला तारेल.

किशोर बेडकीहाळ म्हणाले, डॉ. चौसाळकर हे रुक्ष राज्यशास्त्रज्ञ म्हणून परिचित असले तरी त्यांना संगीतामध्ये, स्वैर गप्पा मारण्यात आणि वाङ:मयाची चिकित्सा करण्यात अभिरुची आहे. त्यांचा सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोण त्यांच्या संदर्भ आणि तपशीलातील लिखाणात येतो.

डॉ. गोपाळ गुरु म्हणाले, कठीण विषय साध्या भाषेत लिहिण्याचा हातखंडा डॉ. चौसाळकर यांच्या लेखनात आहे. अध्यक्षीय भाषणात डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. चौसाळकर यांनी जे उपलब्ध नाही, त्यावर लिखाण केले. संशोधनाचा हा आत्मा आहे. त्यातील संदर्भ आणि तपशील वाचले जातील.

प्रारंभी डॉ. नागोराव कुंभार यांनी लोकशाही विशेषांकाची माहिती दिली. अमृत महोत्सवानिमित्त राजमुद्रा, फेटा आणि शाल देउन डॉ. चौसाळकर यांचा आणि साडी देउन गौरी चौसाळकर यांचा गौरव करण्यात आला.

मान्यवरांच्या हस्ते मुलगा मनिष, सून श्रावणी आणि कन्या ऋतुजा यांचाही सत्कार करण्यात आला. डॉ. विवेक घोटाळे यांनी प्रास्तविक केले. डॉ. शिवाजी पाटील यांनी परिचय करुन दिला. प्रा. सुनील गायकवाड यांनी आभार मानले. प्रा. श्रध्दा कोठावळे यांनी सूत्रसंचालन केले.

21 APR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सकाळ

कोल्हापूर : ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शिवाजी पाटील. सोबत डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. गोपाळ गुरू, गौरी चौसाळकर, डॉ. नागोराव कुंभार, किशोर बेडकिहाळ आदी.

संविधानानुसार राष्ट्रवादाची मांडणी आवश्यक

डॉ. जयसिंगराव पवार; डॉ. अशोक चौसाळकर यांचा अमृत महोत्सवानिमित्त सत्कार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

लोकशाही बलदंड किल्ल्यासारखी असून, सध्या तोफांचे हल्ले सुरू झाल्याने बुरूज ढासळत आहेत. लोकशाही टिकविण्याचे सामर्थ्य भारतीय राज्यघटनेत आहे. राष्ट्रवादाची मांडणी धर्माधिष्ठितपेक्षा संविधानाच्या अनुषंगाने होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने लोकशाही निर्माण होईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद, विचारशलाका त्रैमासिक, द युनिक फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पवार म्हणाले, स्वातंत्र्योत्तर काळात पंडित नेहरू यांनी देशाला नेतृत्व दिले; परंतु कधीही विरोधकमुक्त भारत अशी घोषणा केली नाही. आज भारतीय लोकशाही संकटात आहे. डॉ. गोपाळ गुरू म्हणाले, देश फॅसिझमकडे वळत असून, व्यक्ती बदनाम होत आहे. त्यामुळे संविधान वाचविणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. किशोर बेडकिहाळ म्हणाले, डॉ. चौसाळकर यांचे राजकीय विश्लेषक यापेक्षा माणूस म्हणून मूल्यमापन झाले पाहिजे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. चौसाळकर यांचे राज्यशास्त्राशिवाय गांधी, नेहरू अभ्यास केंद्राच्या उभारणीत महत्त्वाचे योगदान आहे. राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. शिवाजी पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नागोराव कुंभार यांनी 'लोकशाही' विशेषकांबद्दलची भूमिका मांडली. यावेळी डॉ. भारती पाटील, सौ. गौरी चौसाळकर, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील उपस्थित होते.

21 APR 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

धर्मनिरपेक्षतेनेच देशाचा विकास होईल

ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. जयसिंगराव पवार यांचे प्रतिपादन : ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचा अमृतमहोत्सवी सत्कार उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर : ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचा समृतमहोत्सवी सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. शिवाजी पाटील, सोबत गौरी चौसाळकर, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. गोपाळ गुरू, डॉ. किशोर बेडकीहाळ आदी.

लोकशाहीचे बुरूज ढासळत असल्याने लोकशाही संकटात आली आहे. अशावेळी सर्वसामान्यांनी जागरूकतेने धर्माच्या आधारावर राजकारण करणाऱ्या राज्यकर्त्यांना धडा शिकवण्याची गरज आहे. भारतीय राष्ट्रवादाची मांडणी धर्माच्या नव्हे तर संविधानाच्या अनुषंगाने झाली तरच लोकशाहीचे संवर्धन होईल. कारण संविधानानुसार देशाचा विकास लोकशाहीचा आत्मा असलेल्या धर्मनिरपेक्षतेवरच अवलंबून आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र परिषद आणि विचारशलाका त्रैमासिक यांच्या संयुक्त विद्यमाने दसरा चौकातील शाहू स्मारक भवन येथे ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त सत्कार सपत्निक करण्यात आला. तसेच विचारशलाका लोकशाही विशेषांक व गौरवांकाचे प्रकाशन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पवार बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. गौरी चौसाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. पवार म्हणाले, पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी देशाला चांगले नेतृत्व दिले, पण त्यांनी कधी विरोधकमुक्त भारताची घोषणा केली नाही. अटल बिहारी वाजपेयी यांनीही स्वामी विवेकानंद यांच्या विचाराने देश चालवला. परंतू सध्याचे राज्यकर्ते वाजपेयींचे विचार विसरून विरोधकांसह देशाची लोकशाही संपवण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच धर्माच्या आधारावर राजकरण व भ्रष्टाचारी राज्यकर्त्यांच्यामागे जनता वाहत चालली आहे. तरूणांनी वेळीच जागे होवून संविधान रक्षणासाठी मतदान केले पाहिजे. लोकशाही संपवणाऱ्यांना ठणकावून सांगितले पाहिजे जोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आमच्या पाठीशी आहेत, तोपर्यंत आम्हाला घाबरण्याचे कारण नाही. कारण आमची जात कष्टाळू लोकांची जात असून, आम्ही नव्वद टक्के कष्ट व दहा टक्के बुद्धीमत्ता वापरतो. जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे सेवानिवृत्त प्रा. डॉ. गोपाळ गुरू म्हणाले, राजकारण, शिक्षणापलिकडे जावून डॉ. चौसाळकर यांचे प्रत्येक क्षेत्रात कार्य आहे. त्यामुळेच त्यांचा इथे अमृतमहोत्सवी सत्कार मोठ्या उत्साहात साजरा होतोय. डॉ. चौसाळकर आपल्या भुमिकेशी तडजोड न करता जगतात. ते राजकारण, आणि विचाराची सांगड घालून जगतात. सध्याच्या राजकारणाची स्थिती रसातळाला गेली असून, हुकुमशाही फोफावत आहे. राजकीय नैतिकतेला बेलगाम राहिलेला नाही. त्यामुळे सर्वसामान्यांनी लोकशाहीसाठी लढले पाहिजे. ज्येष्ठ विचारवंत डॉ. किशोर बेडकिहाळ म्हणाले, डॉ. चौसाळकर सकारात्मक व्यक्तिमत्व असून, ते छंद सहजतेने जपतात. चित्रपट, संगीत यावर स्वैर गप्पा मारणे त्यांच्यासाठी आनंदाचा ठेवा आहे. वाङ्मयीन कादंबरीची समीक्षा समाजशास्त्राची दृष्टीने करतात. नैतिकता गुंडाळून राजकारण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सध्या पैसा असलेलाच माणूस राजकरण करू शकतोय. त्यामुळे भविष्यात लोकशाहीला महत्व राहील की नाही शंका आहे. सत्काराला उत्तर देताना डॉ. चौसाळकर म्हणाले, लोकशाहीचे आचरण करीत चुका करणाऱ्यांना क्षमा करून मानवाने विकास केला पाहिजे. शिवाजी विद्यापीठात मी ३२ वर्षे कार्यरत होतो. विद्यापीठातून मला खूप काही मिळाले. प्रत्येक कुलगुरूंनी माझा योग्य सन्मान केला. आजही माझा सत्कार केला त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.

अध्यक्षस्थानावरून डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. चौसाळकर जस लिहितात तस वागतात. त्यांनी या वयातही शिक्षणाला पूर्णविराम न देता ते कार्यरत आहेत. त्यांचे प्रत्येक क्षेत्रात मोठे योगदान आहे. पीएच. डी.साठी कडक शिस्तीचा गाईड निवडला पाहिजे. तरच आपण चांगले कार्य करू शकतो. सध्या अभावानेच शिक्षक आणि विद्यार्थी वर्गात येतात, अशी खंतही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली. प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार विशेषांकाविषयी माहिती दिली. डॉ. शिवाजी पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. विवेक घोटाळे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, दलितमित्र व्यंकाप्पा भोसले, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, प्राचार्य टी. एस. पाटील, आदी उपस्थित होते.

21 APR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

... तर खरी लोकशाही निर्माण होणार नाही

डॉ. जयसिंगराव पवार : प्रा. अशोक चौसाळकर यांचा अमृतमहोत्सवानिमित्त सत्कार

कोल्हापूर : ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित विचारशलाका लोकशाही विशेषांक व गौरवांक प्रकाशनप्रसंगी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. अशोक चौसाळकर, गौरी चौसाळकर, किशोर बेडकिहाळ, डॉ. गोपाळ गुरू, शिवाजी पाटील, डॉ. भारती पाटील आदी.

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : 'राष्ट्रवादाची मांडणी धर्माधिष्ठित होत असेल तर खरी लोकशाही निर्माण होणार नाही', असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज येथे केले. 'ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर हे सच्चा लोकशाहीवादी असणारे व्यक्तिमत्त्व आहे', असेही ते म्हणाले.

शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद, विचारशलाका त्रैमासिक, द युनिक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित 'विचारशलाका लोकशाही विशेषांक' व गौरवांक प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते फेटा, शाल, गौरवचिन्ह, श्रीफळ देऊन चौसाळकर यांचा सपत्नीक सत्कार झाला. राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवनमधील मिनी हॉलमध्ये कार्यक्रम झाला.

डॉ. पवार म्हणाले, 'लोकशाही बलदंड किल्ल्यासारखी असून, तोफांच्या हल्ल्यात तिचे बुरुज ढासळत आहेत. राज्यकर्ते धडधडीत भ्रष्टाचार करत आहेत. पैशांच्या नाड्या हातात असल्याचे अर्थमंत्री म्हणत असताना ते पैसे कोणाचे, हे विचारण्याचे धाडस सामान्य माणसांत आले पाहिजे. संविधान, धर्मनिरपेक्षता, आम्ही भारतीय या तत्त्वांच्या आधारावर बळकट राहिलो तरच समाज सुरक्षित राहील. केवळ एका धर्मांची मिरासदारी म्हणजे राष्ट्र नव्हे. राष्ट्र म्हणून टिकायचे असेल तर धर्मनिरपेक्षता लोकशाहीचा आत्मा आहे, हे समजून घ्यायला हवे.'

प्रा. डॉ. गोपाळ गुरू म्हणाले, 'डॉ. चौसाळकर यांची अस्सल जगणे ही पहिली पायरी आहे. सोपे कसे लिहावे, हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. विचारवंतांकडे संशयाने पाहिले जात असून, शंकेचे वातावरण निर्माण केले जात आहे.'

ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ म्हणाले, 'राजकीय संस्कृतीत गुन्हेगारीचा प्रवेश झाला आहे. राजकीय प्रतिनिधींचा पाया संकुचित होत असून, श्रीमंतीशिवाय निवडणूक लढवता येत नाही, अशी परिस्थिती आहे. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणीनंतर घटनेचे मूलभूत स्वरूप बदलण्याचा प्रयत्न कधी केला नाही.'

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय चिंतनातून प्रबोधनाच्या चळवळीत चौसाळकर यांचा मोठा वाटा असल्याचे स्पष्ट केले. या वेळी गौरी चौसाळकर, प्रा. शिवाजी पाटील, डॉ. विवेक घोटाळे, प्रा. डॉ. प्रकाश पवार, प्रा. डॉ. भारती पाटील उपस्थित होते.

नेहरूंचे योगदान विसरून चालणार नाही

- **'स्वातंत्र्योत्तर काळातील नेहरूंचे योगदान विसरून चालणार नाही. त्यांनी कधीही विरोधकमुक्त भारत, अशी घोषणा दिली नाही. हिंदू धर्माविषयी अभिमान जरूर असावा. मात्र, तो रस्त्यावर आणू नका', असे आवाहन डॉ. पवार यांनी केले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2024
पुढारी

'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' ग्रंथावर मंगळवारी चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने मंगळवारी (दि. २३) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त डॉ. विजया पाटीललिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथाचे प्रकाशन व चर्चासत्र आयोजित केले आहे. ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांच्या हस्ते होणार आहे. प्राचार्य टी. एस. पाटील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व ग्रंथाच्या अनुषंगाने मांडणी करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2024
पुण्यनगरी

‘महर्षी शिंदे..’ ग्रंथाचे २३ रोजी प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त डॉ. विजया पाटील लिखित ‘महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन’ या ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा आयोजित केली आहे. दि. २३ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांच्या हस्ते होणार आहे, तर प्राचार्य टी. एस. पाटील या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व या ग्रंथाच्या अनुषंगाने मांडणी करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2024
लोकमत

'महर्षी शिंदेंचे ललित लेखन'चे प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या १५१व्या जयंतीनिमित्त डॉ. विजया पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा मंगळवारी आयोजित केली आहे. प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांच्या हस्ते होणार आहे. प्राचार्य टी. एस. पाटील हे ग्रंथाच्या अनुषंगाने मांडणी करतील. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. कार्यक्रम सकाळी ११:३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होईल. यास उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2024
पुढारी

विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे मंगळवारी ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी शिंदे यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त मंगळवारी (ता. २३) डॉ. विजया पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा आयोजित केली आहे. राजर्षी शाहू सभागृहात सकाळी साडेअकरा वाजता त्यास सुरुवात होईल. ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ प्रमुख उपस्थित राहणार आहेत. प्राचार्य टी. एस. पाटील हे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व या ग्रंथाच्या अनुषंगाने मांडणी करणार आहेत. तरी प्राध्यापक, विद्यार्थी, नागरिक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2024
तरुण भारत

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जयंती मंगळवारी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जयंती विविथ कार्यक्रमांनी साजरी केली जाणार आहे. मंगळवार २३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात डॉ. विजय पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत डॉ. किशोर बेडकीहाळ यांच्या हस्ते होणार आहे. प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील प्रमुख वक्ते आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थान भूषवणार आहेत, तरी जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2024
पुढारी

८१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

पुढारी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे आजअखेर सुमारे ८१ निकाल जाहीर झाले आहेत. शनिवारी मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ आर्टस् (भूगोलशास्त्र), बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स अँड इन्फॉर्मेशन सायन्स, बी.एस्सी., एम.एस्सी. (अर्थशास्त्र एकात्म), मास्टर ऑफ सायन्स (टेक्नॉलॉजी), मास्टर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ सोशल वर्क आदी १७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये झाल्या. दि. २० रोजी बॅचलर ऑफ इंटिरिअर डिझाईन अभ्यासक्रम विविध सत्रांचे निकाल जाहीर करण्यात आले. गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवणाऱ्या भरारी पथकाकडून कोल्हापूर-२, सांगली-३, सातारा-१ अशा सहा गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2024
पुण्यनगरी

विद्यापीठाचे ८१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. २१ मार्चपासून सुरू आहेत. तसेच विविध अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले जात आहेत. शनिवारी ४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले असून, शनिवारअखेर ८१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. शनिवारी एकूण १७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालयांमध्ये झाल्या. या परीक्षांसाठी २ हजार ५११ विद्यार्थ्यांपैकी २६२ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने भरारी पथके स्थापन केली आहेत. शनिवारी कोल्हापूर-२, सांगली-३, सातारा-१ असे तीन जिल्ह्यांतून एकूण ६ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 APR 2024

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठाच्या पाच रग्बी खेळाडूंची झेप

फ्रान्समधील वर्ल्ड युनिर्व्हसिटी महिला व पुरुष स्पर्धेत भारतीय विद्यापीठ संघातून करणार प्रतिनिधीत्व

Hang u, Ch
ODISHA
INDIA

कल्याणी

साक्षी

ODISHA
INDIA

वैष्णवी

प्रतिनिधी
कोल्हापूर

वर्ल्ड युनिर्व्हसिटीच्या वतीने फ्रान्समध्ये १० ते १२ जून या कालावधीत वर्ल्ड युनिर्व्हसिटी चॅम्पियनशीप-२०२४ सेव्हन-ए-साईड महिला व पुरुष रग्बी स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. या स्पर्धेत महिला व पुरुषांचा भारतीय विद्यापीठ संघ प्रतिनिधीत्व करणार आहे. त्यासाठी भुवनेश्वर (ओडीशा) येथील केआयआयटी विद्यापीठाच्या मैदानात महिला व पुरुष संघ निवड चाचणीचे आयोजन केले होते. यापैकी महिला संघाच्या चाचणीत उठावदार कामगिरी करत जाबाज-रग्बीपटू वैष्णवी पाटील, कल्याणी पाटील (दोघी रा. पाडळी खुर्द, ता करवीर), साक्षी कुंभार (हनिमनाळ, गडहिंग्लज) व आकांक्षा कातकडे (सातारा) या चौघींनी भारतीय विद्यापीठ संघात स्थान मिळवले. पुरुषच्या चाचणीतही हार्दिक राजभोसलेने (सातारा) उत्तम खेळ करत भारतीय विद्यापीठ संघात आपले स्थान पक्के केले.

गेल्या जानेवारी महिन्यात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला व पुरुष रग्बी स्पर्धा झाल्या होत्या. यापैकी महिलांच्या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघातून वैष्णवी, कल्याणी, साक्षी व आकांक्षा या चौघी खेळल्या होत्या. त्यांनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत शिवाजी विद्यापीठ संघाला विजेतेपदही मिळवून दिले होते. याचबरोबर अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पुरुष रग्बी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघातून खेळताना साताऱ्याच्या हार्दिक राजभोसलेने लक्षवेधी खेळ केला होता. वरील तिन्हीही स्पर्धांमध्ये वैष्णवी, कल्याणी, साक्षी, आकांक्षा व हार्दिक या पाचही खेळाडूंनी केलेल्या शानदार खेळाची दखल असोसिएशन ऑफ इंडियन युनिर्व्हसिटीने घेतली होती. तसेच त्यांना वर्ल्ड युनिर्व्हसिटी चॅम्पियनशीप-२०२४ सेव्हन साईड महिला व पुरुष रग्बी स्पर्धेसाठी भुवनेश्वर (ओडीशा) येथे आयोजित केलेल्या महिला व पुरुषांचा भारतीय विद्यापीठ संघ निवड चाचणीसाठी असोसिएशनने पात्र ठरवले होते. त्यांनीही मिळालेल्या संधीच सोनं करत भारतीय विद्यापीठ संघात स्थान मिळवले आहे. वैष्णवी, कल्याणी, साक्षी व आकांक्षा या चौघांनी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु प्रमोद पाटील, जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. अमर सासने, प्रशिक्षक दीपक पाटील, प्रा. डॉ. राहुल लहाने व संघ व्यवस्थापक संग्रामसिंह मोरे यांचे मार्गदर्शन लाभत आहेत.

- **महिला संघात वैष्णवी, कल्याणी, साक्षी, आकांक्षाची तर पुरुष संघात हार्दिकची निवड**

भूषणावह कामगिरी

शिवाजी विद्यापीठाच्या पाच महिला व पुरुष खेळाडूंनी फ्रान्समध्ये होणाऱ्या वर्ल्ड युनिर्व्हसिटी चॅम्पियनशीप-२०२४ सेव्हन साईड रग्बी स्पर्धेसाठी भारतीय विद्यापीठ संघात स्थान मिळवले आहे. खेळाडूंची ही दर्जेदार कामगिरी शिवाजी विद्यापीठासाठी खरोखरच भूषणावह आहे, विद्यापीठाच्या क्रीडा अधीविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी सांगितले.